# शेतकरी दादा

शेतकरी दादाची झालीय दैना.....
काय करावं त्याला सुचेना.....

वर्षामागून वर्ष जाती, पाणी-पाऊस होतोय कमती.....
उन्हा-तान्हात आभाळ वरती, सारं घर-बार शेतात राबती.....
फळ कष्टाचं काही मिळेना..... शेतकरी दादाची झालीय दैना.....

कपडे-लत्ते न् मुलांचं शिक्षण, पै-पै ची भासते चण-चण
कसं होणार मुलीचं लगन, काय देणार तीला आंदण
समदं डोकंच झालंय बधीर ना..... काय करावं त्याला सुचेना.....

वाढतो कर्जाचा एकेक डोंगर, त्याच्या हातात फकस्त नांगर
अवकाळी पाऊस महागाई कहर, कसा धरावा त्यानं सबर
मार्ग मुक्तीचा त्याला मिळेना..... शेतकरी दादाची झालीय दैना.....

माय-बाप सरकार लई निवांत, करतं कणभर नि मणभर दावतं.....
जसं आंधळं दळतंय जातं, त्याचं कुत्रंच खातंय पीठ
बळी राजाकडं लक्ष कोणाचं जाईना..... शेतकरी दादाची झालीय दैना.....

कोणे काळी होता बळी राजा, त्याची मिळतेय का त्याला सजा ?
आख्खी दुनिया करतेय मज्जा, मॉला-मॉलात बर्गर नि पिझ्झा
पिकवलं त्यानं तर खाल ना..... शेतकरी दादाची झालीय दैना.....

काय करावं त्याला काही सुचेना.....

पण...का ऽ हो ऽ ऽ
आत्महत्येने सुटतात का प्रश्न, त्याने संपतं का जगणं-मरणं ?
जगी सुखी आहे कोण ? वाड-वडिलांनी ठेवलंय सांगून
धीर-विश्वास ठेवावा मना..... शेतकरी दादाची मिटेल दैना.....
मग काय करावं त्याला सुचेल ना.....

त्यानं उठवावं आता रान, पावलं उद्याची ओळखून
नवी दिशा नि मिळेल चालना, काय करावं त्याला सुचेल ना.....
मग शेतकरी दादाची मिटेल दैना..... शेतकरी दादाची मिटेल दैना.....



- भारुकाका.कॉम
मो. 9321550286